Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 21/03/2025**

# Activity Name: Day Special

# दिन विशेष

### News Paper Name: आपलं महानगर

**Page No. 04**

# दिनविशेष



## देशभक्त, क्रांतिकारक मानवेंद्रनाथ रॉय

मानवेंद्रनाथ रॉय ऊर्फ नरेंद्रनाथ भट्टाचार्य हे एमएन रॉय म्हणूनही ओळखले जात. ते २० व्या शतकातील भारतीय क्रांतिकार, तत्वज्ञानी, कट्टरपंथी कार्यकर्ते आणि राजकीय सिद्धांतकार होते. रॉय हे मेक्सिकन कम्युनिस्ट पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (ताश्कंद गट) संस्थापक होते. त्यांचा जन्म २१ मार्च १८८७ रोजी पश्चिम बंगालमधील परगणा येथील अर्बेलिया येथे, कलकत्ता (कोलकाता) जवळ झाला. रॉय यांचे सुरुवातीचे शालेय शिक्षण अर्बेलिया येथे झाले. ते कम्युनिस्ट आंतरराष्ट्रीय काँग्रेसमध्ये प्रतिनिधी होते आणि चीनमध्ये रशियाचे सहाय्यक होते. दुसऱ्या महायुद्धानंतर रॉय यांनी रूढीवादी मार्क्सवादापासून दूर जाऊन कट्टरपंथी मानवतावादाच्या तत्वज्ञानाचे समर्थन केले आणि उदारमतवाद आणि साम्यवाद यांच्यातील तिसरा मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला.

रॉय यांचे लेखन कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे साप्ताहिक बूलेटिन, इंटरनॅशनल प्रेस कॉरस्पॉन्डन्स (इंप्रिकॉर) द्वारे प्रकाशित केले जात असे. रॉय यांनी आठ वर्षे कॉमिनटर्नच्या प्रेसिडियमचे सदस्य म्हणून काम केले आणि एका टप्प्यावर ते राजकीय सचिवालय, कार्यकारी समिती आणि जागतिक काँग्रेसचे सदस्य होते. १९३४ ला सर्वप्रथम संविधान सभेची संकल्पना त्यांनी मांडली. भारतीय स्वातंत्र्यलढ्यासाठीच्या सशस्त्र क्रांतिकार्यात सहभागी झालेल्या रॉय यांना उत्तरायुष्यात मेक्सिको, रशिया, अफगाणिस्तान, चीन इत्यादी देशांत केलेल्या कार्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील एक नामवंत साम्यवादी विचारवंत म्हणून मान्यता लाभली. यांनी स्थापन केलेला मेक्सिकन साम्यवादी पक्ष हा सोव्हिएत संघाबाहेरील पहिला साम्यवादी पक्ष होता. त्यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरीस साम्यवादाचा त्याग करून जहाल मानवतावाद पुरस्कारला. एमएन रॉय यांचे २५ जानेवारी १९५४ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Mar 21, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401